REGISTERED No. B. 3434

# अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

**प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.**

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ४ आ.

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

"अर्थ"

"दुर्गाधिवास" पुणें ४.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १७ आगस्ट, १९४९ | अंक ३२

श्री श्री श्री श्री श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

### युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण

वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री श्री

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## सोसायट्यांस विनंति

किर्लोस्कर कंपनी सोसायट्यांना ज्या भावांत माल देते त्याच भावांत आम्हीहि नांगर वगैरे माल पुरवितों. आपली कोणतीहि ऑर्डर आपण आमचे मार्फत पाठविण्यानें तोटा नसून फायदाच आहे. सर्व तऱ्हेची सोसायट्यांना लागणारी माहिती व इतरहि माल आम्ही पुरवितों.

या वर्षीची ऑर्डर आमचे मार्फतच पाठवा.

केळकर बंधु, पुणें व नाशिक.


## विविध माहिती

**कलकत्त्याचा दूध पुरवठा**—हिंदुस्थानांतील इतर मोठ्या शहरांप्रमाणेंच कलकत्त्यांतहि दुधाची टंचाई जाणवत आहे. ही टंचाई अंशतः दूर करण्याच्या हेतूनें पश्चिम बंगाल सरकारनें कलकत्त्यापासून ३५ मैलांवर एक गुरांचें संशोधन केंद्र उघडण्याचें ठरविलें आहे. दुभत्या जनावरांची पैदास व जोपासना करण्याचें हें कार्य १९५० एप्रिलपासून चांगलें सुरू होईल. त्यासाठी ५३ लाख रुपये खर्च येईल आणि कलकत्त्याच्या दूध पुरवठ्यांत रोज ७० मणांची भर पडेल.

**राजाबहादूर गिरणी बंद होणार**—पुणें येथील राजाबहादूर गिरणीच्या चालकांनीं कामगारांना अशी नोटीस दिली आहे कीं, तीं. १ सप्टेंबरपासून गिरणी बंद करण्यांत येणार आहे. गिरणीच्या कापडाचा व सुताचा खूप सांठा पडून असल्यामुळें पैसा अडकून पडला आहे; त्यामुळें गिरणी बंद करण्याशिवाय अन्य मार्ग नाहीं, असें चालकांचें म्हणणें आहे.

**नवीं तिकिटें लंडनला रवाना**—स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं लंडनमधील लोकांना देण्यासाठी म्हणून ४५० पौंड वजनाचीं नवीं हिंदी पोस्टाचीं तिकिटें लंडनमधील हिंदच्या हाय कमिशनरकडे धाडण्यांत आलीं. ह्या तिकिटांत निरनिराळ्या १६ दरांचीं तिकिटें आहेत.

**इजिप्तला अमेरिकेची मदत हवी**—इजिप्तच्या मुख्य प्रधानांनीं अमेरिकेकडून आपल्या देशास मार्शल मदत मिळावी अशी इच्छा प्रदर्शित केली आहे. ब्रिटन व अमेरिका ह्यांनीं अरब राष्ट्रांशीं सहकार्य करून मध्यपूर्वेतील देशांना असणाऱ्या कम्युनिझमच्या धोक्याला आळा घालावा, अशीही सूचना त्यांनीं केली आहे.

**सर चिंतामण देशमूख**—रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर, सर चिंतामण देशमुख, ह्यांची नवी नेमणूक जाहीर झाली आहे. युरोप व अमेरिका येथील आर्थिक व नाणेंविषयक घटनांचा हिंदी हितसंबंधांशीं जिव्हाळ्याचा संबंध पोचतो. त्या दृष्टीनें निर्माण होणाऱ्या प्रश्नांसाठी हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून सर चिंतामणरावांनीं काम करावयाचें आहे.

**मध्यमवर्गाची हलाखीची स्थिति**—रिझर्व्ह बँकचे गव्हर्नर सर बी. रामराव ह्यांनीं एका प्रसंगीं असे उद्गार काढले कीं, सध्या देश ज्या अडचणींच्या काळांतून जात आहे, त्यांत मध्यमवर्गावर इतरांपेक्षा अधिक ताण पडत आहे. त्यामुळें मध्यमवर्गाचा राहणीचा 'दर्जा खालावला आहे. सध्याच्या बदललेल्या परिस्थितीशीं मध्यमवर्गानें जुळवून घेतलें नाहीं तर तो वर्ग नामशेष होण्याचा संभव आहे. मध्यमवर्गीतील स्त्रिया द्रव्यार्जन करूं लागल्याशिवाय हा संभव टळण्यासारखा नाहीं. पूर्वी जे कर ग्रामीण जनता देत असे त्यांचा भार विक्रीकराच्या रूपानें आतां मध्यमवर्गावर पडलेला आहे.


मिळालेल्या राजकीय स्वातंत्र्याचें चीज करणें जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील नागरिकांचें कर्तव्य आहे.

**डेक्कन मर्चंट्स् को-ऑपरेटिव्ह बँक**

दोन वर्षे हें कर्तव्य बजावीत आलीच आहे. स्वातंत्र्यकालांत अधिक सेवातत्पर राहाण्याची तिची उमेद आहे.

सर्व भागीदारांनीं, ठेवीदारांनीं व संबंधितांनीं या कामीं सहकार्य करावें.

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार आम्हीं सांभाळतो.

| | |
|---|---|
| दादर शाखाः— | मुख्य कचेरी, मुंबई ४. |
| बी. बी. सी. नजीक | २१७, चर्नी रोड, गिरगांव |
| टे. नं. ६१०४५ | टे. नं. २५२४५ |
| मो. बा. वेलकर | एस्. एम्. पाटकर |
| चेअरमन | मॅनेजिंग डायरेक्टर. |

United Advertisers.

# अर्थ

बुधवार, ता. १७ आगस्ट १९४९



संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## संस्थानें व संस्थानांचे संघ प्रांतांच्या पंक्तीला येणार

### कृष्णमाचारी कमिटीचा रिपोर्ट

हिंदी संस्थानें व संस्थानांचे संघ हे हिंदी संघराज्याचे घटक बनले तरी आर्थिक व करविषयक दृष्टीनें त्यांचा दर्जा प्रांतांच्या बरोबरीनें येणें आवश्यकच होतें. ह्यासंबंधांत शिफारशी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें गेल्या ऑक्टोबरमध्यें सर व्ही. टी. कृष्णमाचारी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली होती. तिचा अहवाल आतां प्रसिद्ध झाला आहे. १ एप्रिल, १९५० रोजीं हिंदी संस्थानें व संस्थानांचे संघ संघराज्यांत खऱ्या अर्थानें आर्थिक दृष्ट्या सामील होतील आणि तेव्हांपासून त्यांच्यांत व प्रांतांत त्या बाबतींत तत्त्वतः फरक उरणार नाहीं. दहा वर्षांचे अवधींत हें आर्थिक एकत्रीकरण पुरें व्हावयाचें आहे. त्रावणकोर-कोचीन संघाचें नवें हिशेबी वर्ष १७ ऑगस्ट १९४९ रोजीं सुरू होत आहे आणि तो संघ त्या दिवसापासूनच प्रांतांच्या पंक्तीला घेऊन बसत आहे. फक्त एका संस्थानानें आपले हक्क कमी करण्यास अद्याप संमति दिलेली नाहीं. संस्थानी मुलूख इतर हिंदी मुलुखाशीं एकजीव होण्यास त्यांचे आर्थिक व करविषयक धोरण सारखें असणें अगत्याचेंच आहे; परंतु त्याबरोबर कृष्णमाचारी कमिटीनें गोंधळ व गैरसोय टाळण्यासाठी कांहीं तपशीलाचे बाबतींत घाई न करण्याचीहि सूचना केली आहे.

१ एप्रिल १९५० पासून सर्वत्र इनकमटॅक्स सुरू करण्यांत येईल. मध्यवर्ती सरकारच्या कायद्यानें सांगितलेल्या दरानें संस्थानी मुलुखांत आकारणी व वसुली होईल. प्रचलित हिंदी कराच्या दराची अंमलबजावणी एकदम सुरू करतां येणें शक्य नसल्यानें दोन-तीन वर्षांमध्यें कराचा दर वाढवीत हिंदी दराइतका तो केला जाईल. १ एप्रिल १९५० पासून संस्थानांतील अंतर्गत जकाती पूर्णपणें रद्द करण्यांत येतील. राजस्थान आणि मध्यभारत येथें मात्र त्या हळुहळु रद्द केल्या जातील. मध्यवर्ती इतरहि उत्पन्नाच्या बाबी सरकार स्वतःकडे घेईल, त्यास फक्त त्रावणकोर-कोचीन पोस्ट खातें हा अपवाद आहे. प्रांत व संस्थानें एका आर्थिक पातळीवर आल्याचें जाहीर झालें कीं तात्काळ ग्रँट, देणग्या, इतर प्रकारचें आर्थिक व तांत्रिक सहाय्य, इत्यादि बाबतींत संस्थानें व प्रांत ह्यांस समानतेनें वागविलें जाईल. संस्थानी ताब्यांतील सुमारें ७,००० मैल लांबीचा रेल्वेरस्ता आतां मध्यवर्ती कक्षेंत जाणार असल्यामुळें संस्थानांचें नुकसान व त्या मानानें मध्यवर्ती रेल्वेजचा फायदा होणार आहे, हें लक्षांत घेऊन रेल्वे बजेटांतून मध्यवर्ती बजेटास देणगी मिळत जाईल. संस्थानी लष्कराचा खर्च मध्यवर्ती सरकार करील.

ह्या सबंध योजनेच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवून त्याचा वार्षिक अहवाल हिंदुस्थान सरकारास सादर करणारी एक अत्यंत श्रेष्ठ लायकीची कमिटी नेमण्यांत यावयाची आहे. प्रत्येक संस्थानाच्या आर्थिक प्रश्नाचा कृष्णमाचारी कमिटीनें स्वतंत्रपणें तपशीलवार विचार करून प्रत्येकाच्या परिस्थितीप्रमाणें कार्यक्रम आखून दिला आहे.

कराच्या बाबींच्या मालकीमध्यें बदल झाल्यामुळें, म्हणजे आजवर जे कर संस्थानें वसूल करीत आहेत, ते मध्यवर्ती सरकारकडे जाणार असल्यामुळें, संस्थानांच्या उत्पन्नांत जी घट पडेल, ती विचारांत घेऊन त्याची भरपाई कशी केली जाईल हेंहि कमिशननें दाखवून दिलें आहे. कालांतरानें मात्र मध्यवर्ती सरकारकडून मिळावयाची रक्कम कमी कमी करण्यांत येईल. कृष्णमाचारी कमिटीनें, संस्थानें आजवर उपभोगीत असलेले कर-अधिकार मध्यवर्ती सरकारकडे वर्ग करण्याचे बाबतींत केलेल्या शिफारसींची रूपरेषा वरीलप्रमाणें आहे. ब्रिटिश राजवटींत संस्थानांना उपलब्ध असलेले उत्पन्नाचे मार्ग आतां कमी होणार आहेत, परंतु त्याबरोबरच हिंदी प्रांतिक कारभाराच्या तुलनेचा कारभार त्यांत सुरू होणार असून सरकारी खर्चाचे दर माणशी पडणारें प्रमाण वाढणार आहे. राजकीय दृष्ट्या संस्थानें हिंदी संघराज्यांत आलीं, त्याचे पाठोपाठ त्यांचें आर्थिक एकीकरणहि होत आहे आणि हिंदुस्थानाच्या प्रगतीच्या दृष्टीनें तें अत्यंत महत्त्वाचें आहे. हा पालट होत असतां चालू घडी एकाएकी बिघडूं न देण्याची दक्षता अर्थातच बाळगली पाहिजे.

### वर्ल्ड बँकेचें हिंदुस्थानास कर्ज

हिंदुस्थानाच्या आर्थिक वाढीसाठी लवकरच कर्ज देण्याचा निर्णय वर्ल्ड बँकेनें जाहिर केला आहे. ( १ ) रेल्वेजसाठी लागणारी इंजिनें, सुटे भाग व तेलवाहू वॅगन्स, ( २ ) बिहारमध्यें एका १,५०,००० कि. वॅ. थर्मल वीज केंद्राची उभारणी व ( ३ ) वेगवेगळया भागांतील, हरळीनें नाश केलेल्या जमिनी लागवडीस योग्य करणें ह्या तीन योजनांसाठी परदेशी हुंडणावळ खर्चावी लागेल, तिची व्यवस्था बँक करील.

### कम्युनिझमला चीनमध्येंच थोपविण्यांत येईल

अमेरिकेच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटनें चीन-अमेरिका संबंधांबाबत १०५४ पानी पत्रक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत, चांग-काय-शेकचें राज्य संपलें, असें गृहीतच धरलें आहे आणि "चीनचे बाहेर कम्युनिझमचा प्रसार कराल तर याद राखा," असें रशियाला व चिनी कम्युनिस्टांना बजावलें आहे.

### हिंद-ब्रिटन स्टर्लिंग करार

हिंद-ब्रिटन स्टर्लिंग करार झाला आहे, त्याचे अन्वयें हिंदुस्थानास आपली चूक सुधारण्यास संधि मिळाली आहे. म्हणजे, ओपन जनरल लायसेन्स रद्द करीपर्यंतचें हिंदुस्थानानें निर्माण केलेलें भरमसाट देणें त्याला भागवितां येण्याची करारानें तरतूद केली आहे. येत्या दोन वर्षांत हिंदुस्थानास जास्त स्टर्लिंग उपलब्ध होणार आहेत. डॉलर चलनाच्या देशांकडून आयात होणाऱ्या मालांत २५% कपात हिंदुस्थानानें करावयाची आहे.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

हिंदुस्थानांतील लायक, मोठ्या उद्योगधंद्यांना भांडवली मदत करण्याचे उद्देशानें वरील कॉर्पोरेशन स्थापन करण्यांत आली. तिच्या ३० जून १९४९ अखेरच्या पहिल्या वार्षिक अहवालानें हिंदी कारखानदारांवर उत्कृष्ट प्रकाश पाडला आहे. कॉर्पोरेशनकडे एकूण १५६ कारखान्यांनीं कर्जाबाबत चौकशी केली आणि त्यापैकीं ९५ कारखान्यांनीं एकूण १०,३३,१८,००० रुपये कर्जासाठी अर्ज केले. प्रत्यक्ष २१ अर्जदारांना ३,४२,२५,००० रुपये कर्ज मंजूर करण्यांत आलें असून ३३ अर्जदारांना नकार देण्यांत आला आहे. बाकीच्या अर्जांची तपासणी चालू आहे.

ज्या २१ अर्जदारांना ३,४२,२५,००० रु. कर्ज मंजूर करण्यांत आलें, त्यांचें वसूल भांडवल ४,७६,३२,००० रुपये होतें व त्यांनीं ३,६५,२५,००० रुपये कर्जाची मागणी केलेली होती. मंजूर केलेल्या कर्जापैकी १,३२,९९,२१५ रुपये अहवालाचे वर्ष-अखेर देण्यांत आलेले आहेत. कॉर्पोरेशन कंपन्यांच्या मालमत्तेच्या अग्रहक्काच्या गहाणावरच कर्ज देते आणि तिचा व्याजाचा दर वक्तशीर वागणारांना ५ ते ५½% पडतो.

कॉर्पोरेशनचें कर्ज जोंपर्यंत फिटलेलें नाहीं तोंपर्यंत कर्जदार कंपन्यांनीं त्यांच्या वसूल भांडवलावर ६% पेक्षा अधिक दरानें डिव्हिडंड वाटता कामा नये, असें त्यांचेवर बंधन घातलेलें असतें. कर्जाची मुदत सामान्यतः १२ वर्षांची असते, परंतु अहवालाचे वर्षी १५ वर्षे मुदतीचें कर्जहि देण्यांत आलेलें आहे.

अहवालाचे वर्षी कॉर्पोरेशनला ८५,५०८ रुपये निव्वळ नफा झाला. त्यापैकी ५०,००० रुपये रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले आहेत. मध्यवर्ती सरकारनें कॉर्पोरेशनच्या शेअर्सवर २¼% डिव्हिडंडची हमी घेतलेली आहे. त्याप्रमाणें हें डिव्हिडंड देण्यासाठी कॉर्पोरेशन सरकारकडे १०,८९,४९३ रुपयांची मागणी लवकरच करील.

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनला कित्येक मोठ्या हिंदी उद्योगधंद्यांची पहाणी करण्याची संधि मिळाली. कारखान्यांच्या उभारणींत योजकतेचा अभाव, तांत्रिक मदत अपुरी असणें किंवा ती कमी दर्जाची असणें, कार्यक्षम उत्पादन पद्धतीच्या माहितीचा अभाव, उत्पादनास पडणाऱ्या किंमतींची हिशेबी पद्धतीनें छाननी करण्याकडे दुर्लक्ष, इत्यादि महत्त्वाचे दोष कॉर्पोरेशनला आढळून आले. युद्धकाळांत कारखान्यांना मालाच्या दर्जाकडे लक्ष पुरविण्याचें कारण नव्हतें आणि उत्पादनक्षमतेची आवश्यकता भासली नव्हती. परंतु, जे कारखाने युद्धकाळांत तेजींत होते, त्यांना आतां स्पर्धेत टिकाव धरणें कठीण होऊं लागलें आहे.

## सुताच्या वापरास सढळ परवानगी

हिंदी गिरण्यांनीं तयार केलेल्या सुताचा आतां तुटवडा नसल्याकारणानें, त्या सुताच्या वाढत्या उपयोगास हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली आहे. ३० सप्टेंबर १९४४ पूर्वी जेवढे माग चालू होते, त्यापेक्षा ज्यास्त माग पॉवर लूम फॅक्टऱ्यांनीं चालविण्यास हरकत नाहीं. मात्र, हे माग ह्या परवानगीच्या तारखेपूर्वी घेतलेले असले पाहिजेत. टेक्स्टाईल कमिशनरनें ज्यांना कपाशीचें सूत न वापरण्याच्या अटीवर माग बसविण्यास परवानगी दिली होती, अशांना कपाशीचें सूत वापरण्यास परवानगी दिली जाईल. योग्य परवानगीशिवाय माग बसविल्याबद्दल जे माग सील करून ठेवले होते, असे मागहि चालू करतां येतील.

## स्वातंत्र्याचा दुसरा वाढदिवस

या वर्षभरांत हिंदचें लोकराज्य ( रिपब्लिक ऑफ इंडिया ) उदयास येईल व आपल्या देशाच्या आयुष्यांत एका नवीन खंडास प्रारंभ होईल. संक्रमणावस्थेचा एक काल संपून दुसऱ्यास सुरवात होईल. आपण अखिल हिंदुस्थानच्या हिताचाच विचार करून सर्वांच्या कल्याणाच्या कार्यास वाहून घेतलें पाहिजे. अनेक प्रकारचे भार सहन करण्याचा व जिच्या कल्याणावर व समाधानावर हिंदुस्थानचें अंतिम भवितव्य अवलंबून आहे अशा सामान्य हिंदी जनतेचाच इतर गोष्टी-पेक्षां प्रथम विचार केला पाहिजे. आर्थिक अरिष्टानें सामान्य लोकांस व त्यांतल्या त्यांत मध्यमवर्गास फारच पीडलें आहे, परंतु हें आमच्याच नव्हे तर जगांतील बहुसंख्य देशांचेही नशिबीं आलें आहे.

स्वतंत्र हिंदुस्थानचा स्वतंत्र नागरिक या नात्यानें आपण कामाचा व जबाबदारीचा कांहीं भाग उचललाच पाहिजे, अशी प्रत्येकाला जाणीव असली पाहिजे. सरकारें, मग तीं कितीही चांगलीं असलीं तरी, त्यांचें अनुशासन मर्यादित भागापुरतेंच असतें. लोकशाही सरकारला जनतेचें संपूर्ण सहकार्य व कष्टच कोणताही मोठा प्रश्न सोडवितांना लागतात. मानवतेच्या प्राथमिक गरजेचा, अन्नाचा प्रश्न आपल्यापुढें आहे. ज्या प्रमाणांत आम्हीं यांत यशस्वी होऊं त्या प्रमाणांत आम्हीं ह्याहिपेक्षां मोठ्या आर्थिक क्षेत्रांत यशस्वी होऊं. जोंपर्यंत अन्नाचे बाबतींत आपण स्वयंपूर्ण होत नाहीं तोंपर्यंत आपण दुसऱ्यांवर अवलंबून राहाणार. म्हणून आपणांपैकीं प्रत्येकजण आपल्यापुढें असलेल्या कामास लागूं या. ह्या कामांतून एका समष्टीसाठी मोठ्या प्रमाणावर सहकार्य निर्माण होईल व ह्या सहकार्यामुळें इतर अनेक प्रश्न सुटतील.

आपल्या दृष्टीनें ऐतिहासिक महत्त्वाच्या आजच्या ह्या दिवशीं आपण मोठ्या आदरानें महात्मा गांधींची व त्यांच्या शिकवणीची आठवण करूं या व ज्यांनीं आपणांस स्वातंत्र्या-प्रत नेलें त्यांना शोभेसें आपण होऊं, असा निश्चय करूं या.

जवाहरलाल नेहरू.

**फरीदकोटच्या महाराजांची शेती**—फरीदकोटच्या महाराजांचे संस्थान आतां पूर्व-पंजाब संस्थान संघांत विलीन झालें असलें तरी त्यांच्या मालकीची जमीन अजूनही बरीच आहे. फरीदकोट संस्थानच्या हद्दींत त्यांची ३१,००० एकर उत्तम प्रतीची जमीन असून पूर्व पंजाबांत १९,००० एकर जमीन आहे. ही सर्व जमीन आतां यांत्रिक नांगरांच्या साह्यानें लागवडीस आणण्यांत येत आहे. त्यांचें संस्थान संघराज्यांत समाविष्ट झालें त्यावेळीं संस्थानाच्या तिजोरींत १४९ लाख रुपये होते. त्यापैकीं १०९ लाख रुपये त्यांची खाजगी मालमत्ता म्हणून ठरावेण्यांत आली.

**पाकिस्तानांत रशिअन व्यापारी प्रतिनिधी**—पाकिस्तान सरकारशीं व्यापारासंबंधीं बोलणीं करण्यासाठी १२ जणांचें एक रशियन मंडळ नुकतेंच कराचीला आलें आहे. पाकिस्तानांत सध्या रशिअन कापड येऊं लागलेंच आहे. शिवाय रशिआकडून पाकिस्तान यंत्रसामुग्री घेणार असल्याची वार्ताही आली होती. ब्रिटन पाकिस्तानच्या यंत्रसाहित्याच्या मागण्या पुऱ्या करीत नसल्यामुळें पाकिस्तान सरकार रशिआशीं संधान बांधीत आहे, असें म्हणतात.

# खरा प्रश्न आहे संपत्ति निर्माण करण्याचा.

## दर ताशीं, दर माणशीं उत्पादन कसें वाढेल ?

आजच्या आर्थिक संकटाचें वर्णन अगदीं थोडक्यांत व सोप्या शब्दांत करता येण्याजोगें आहे.

इंग्रजांना त्यांच्या राहणीचा दर्जा टिकवितां येणें अशक्य झालें आहे, ह्याचें कारण इंग्लंडमधील लोक ज्या प्रमाणांत अन्न व माल ह्यांचें उत्पादन करतात, त्यापेक्षां मोठ्या प्रमाणांत ते त्यांचा उपभोग घेतात. म्हणजे, मिळकतीपेक्षां त्यांची गरज मोठी आहे. हिंदुस्थानांतील लोकांचीहि हीच परिस्थिति आहे. आपण जेवढें उत्पादन करतों त्यामानानें आपणांस जास्त अन्न-वस्त्र हवें आहे; आणि तें मिळणें कठीण झालें आहे.

इंग्रजांना श्रीखंडपुरी दररोज खाण्याची पिढ्यान्‌पिढ्या संवय झालेली आहे. परंतु त्यांची इनामदारी नष्ट होत चालल्यामुळें पूर्वी-इतक्या परिश्रमांत त्यांना ती मिळणें अवघड झालें आहे. शिरापुरी त्यांना मिळूं शकेल. परंतु श्रीखंडपुरीच्या संवयीमुळें शिरापुरी मिळणें त्यांना उपासमारीसारखें झालें आहे.

हिंदी लोकांना साधी भाकरहि दुर्मिळ होऊं लागली आहे. आपलें उत्पादन आपणांस साधी भाकरहि देण्यास असमर्थ ठरत आहे. १०-२० वर्षांपूर्वी "आपण" आणि आजचे "आपण" ह्यांत फार मोठा फरक आहे आपली लोकसंख्या झपाट्यानें वाढत आहे. संपत्तीच्या "भाज्यास" लोकसंख्येच्या "भाजका"नें भागलें तर दर माणशीं प्रमाण पूर्वीचे मानानें कमी पडूं लागलें आहे. "भागाकार" लहान येऊं लागला आहे.

इंग्रजानें शक्य तेवढे श्रम केले तरी त्यास हवी असलेली रहाणी टिकवितां येत नाहीं आणि आपणहि कष्ट केले तरी ते आपल्या किमान गरजा भागविण्याइतके पुरेसे होऊं शकत नाहींत. म्हणजे, केवळ श्रम केल्यानें संपत्ति निर्माण होत नाहीं, असा अर्थ झाला. श्रमाच्या मानानें संपत्ति निर्माण कां होत नाहीं हा महत्त्वाचा प्रश्न आहे, आणि दर माणशीं दर ताशीं ज्या प्रमाणांत ही निर्मिती जास्त त्या प्रमाणांत लोकांची रहाणी चांगली होण्यास सहाय्य होतें.

हातमागावर काम करणाऱ्या मजुरापेक्षां गिरणींतील मजूर काम कमीच वेळ करतो, परंतु त्याचें हातून अधिक संपत्ति निर्माण होते, म्हणून त्यास वेतन जास्त मिळतें. लहान बँकेंतील अकाउंटंटपेक्षां मोठ्या बँकेंतील पट्टेवाल्यासहि पगार अधिक मिळूं शकतो, कारण मोठ्या बँकेचें उत्पन्न मोठें असतें, म्हणजे तिचेमधील नोकर जास्त संपत्ति मिळवून देतात. अशा प्रकारचीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. दर माणशीं दर ताशीं संपत्तीचें उत्पादन वाढलें म्हणजे वेतन जास्त मिळूं शकतें. हें उत्पादन कमी झालें कीं वेतनहि कमी होतें. साहजिकच रहाणीचा दर्जा वाढतो किंवा उतरतो.

मजुरांचे अंगांतून घाम किती गळतो, कारकून किती तास मान मोडून काम करतो, यंत्रें किती काळ फिरत राहतात इत्यादि गोष्टींवरून केवळ संपत्तीच्या उत्पादनाचा हिशेब करतां येत नाहीं. हें उत्पादन किती कार्यक्षमतेनें होतें, किती कमी वेळांत व कमी श्रमांत अधिकांत अधिक तें घडवून आणतां येतें व इतरांपेक्षां किती कमी किंमतीस तें आपणांस दुसऱ्यास विकतां येतें, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

कांहीं देशांतील लोकांचे हातून स्वस्त व सुबक उत्पादन होतें तर कांहीं देशांतील लोकांना तें साधत नाहीं. त्याला कारणें अनेक आहेत. परंतु ज्यांचे हातून अधिक संपत्ति कार्यक्षमतेनें निर्माण होते, ते लोक श्रीमंत व सुखी होतात आणि बाकीचे मागासलेले रहातात.

अमेरिका व इंग्लंड यांचें उदाहरण घेऊन हीं गोष्ट स्पष्ट करणें सोईचें आहे, कारण त्यांचेसंबंधीं तपशीलवार माहिती सहज मिळूं शकते.*

युद्धापूर्वी अमेरिकेंतील कारखान्यांतून दर माणशीं दर ताशीं जेवढें उत्पादन होत असे, त्याच्या एकतृतियांशइतकेंहि ब्रिटिश कारखान्यांतून होत नसे. मोटारी, टायर्स इत्यादींच्या उत्पादनाचे बाबतींत अमेरिकेची कार्यक्षमता चार ते साडेचार पट होती; पोलाद व कापड ह्यांचे बाबतींत ती दुप्पट होती आणि सिमेंटचे बाबतींत ती सव्वापट होती. खाणींचें उत्पादन अमेरिकेंत दर माणशीं दर ताशीं चौपट होत असे.

अमेरिकन कामगारांची उत्पादनशक्ति एवढी मोठी होती, तर त्यांचेश वांट्यास येणारी संपत्तीहि त्याच प्रमाणांत मोठी असावयास पाहिजे. म्हणजे, इंग्रज कामगारांची रहाणी अमेरिकन कामगारांच्या मानानें फारच निकृष्ट असावयास पाहिजे. परंतु, इतका फरक पडला नाहीं. ह्याचें कारण, अमेरिकेंत दर ताशीं दर माणशीं उत्पादन अधिक होतें, तरी तेथील कामगार इंग्रज कामगारांपेक्षां कमी तास काम करतात. त्यामुळें अमेरिकेंतील दर माणशीं उत्पादन इंग्लंडमधील तत्सम उत्पादनापेक्षां २½ पटच भरत असे. ज्यास्त तास काम करून इंग्रज कामगार उत्पादन करी, त्यामुळें एकूण उत्पादनांतील तफावत थोडी कमी होई.

उत्पादनाच्या सर्वच क्षेत्रांतील अमेरिकन उत्पादनक्षमता ब्रिटिश उत्पादनक्षमतेपेक्षां ज्यास्त असली, तरी शेती व वहातूक ह्या क्षेत्रांत मात्र इंग्रज मागें नव्हते. शेती, कारखानदारीचीं विविध क्षेत्रें, इत्यादींमधील कामगारांची वांटणी लक्षांत घेतली, बेकार कामगारांचें एकूण कामगारांशीं पडणारें प्रमाण विचारांत घेतलें आणि परदेशांतील गुंतवणीचें उत्पन्न हिशेबांत घातलें म्हणजे अमेरिकन कामगाराची संपत्तीची निर्मिति ब्रिटिश कामगारांपेक्षां सव्वापटीपेक्षां जास्त नव्हती, असा अंदाज करण्यांत आला आहे. युद्धापूर्वीची ही परिस्थिति आहे.

युद्धकाळांत इंग्लंडला मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागला. हा खर्च त्या देशाच्या चालू उत्पन्नांतून भागण्यासारखा नव्हता, इंग्लंडनें आपली परदेशांतील गुंतवण मोडून युद्धखर्च चालू ठेवला. त्याचा परिणाम असा झाला कीं त्या गुंतवणुकीवर मिळणाऱ्या व्याजाचा व डिव्हिडंडचा झरा आटला आणि इंग्रजांच्या दरमाणशीं वाट्यास येणारी संपत्ति कमी झाली. ह्या संपत्तीचे विनिमयांत इंग्लंड अन्नाची आयात करीत असे. परंतु, आतां त्याऐवजीं प्रत्यक्ष इंग्लंडमध्येंच अन्नाचें उत्पादन करावें लागत आहे आणि तें पूर्वीचे मानानें फार महाग पडत आहे. युद्धाचें आधीच्या काळांत, परदेशांतून अन्न मागविणें इंग्लंडला फायद्याचें होत असे; आतां कारखानदारीपेक्षां कमी संपत्ति देणाऱ्या शेतीस

*( रॉयल एकॉनॉमिक सोसायटीच्या एकॉनॉमिक जर्नलच्या एप्रिल, १९४३ च्या अंकांत मि. एल. रॉस्टस ह्याचा " ब्रिटन, जर्मनी व अमेरिका ह्यांचेमधील औद्योगिक उत्पादन, उत्पादन-क्षमता आणि उत्पादकांच्या वांट्यास येणारी संपत्ति " हा निबंध प्रसिद्ध झाला. त्यांत १९३७ पर्यंतच्या माहितीचे आधारावर तिन्ही देशांची तुलना केलेली आहे. " डिसकव्हरी " मासिकांतील मि. फ्रीडवॉल्ड ह्यांच्या ताज्या ( एप्रिल १९४९ ) लेखांत युद्धकालानें केलेले बदल सांगितले आहेत. )

महत्त्व देण्यावांचून गत्यंतर उरलेलें नाहीं. इकडे, कामगारांचे कामाचे तास कमी करण्यांत आले आहेत. त्यामुळें, त्यांना स्वास्थ्य लाभलें तरी दरमाणशीं होणारें उत्पादन घटलें आहे.

कांहीं बाबतींत अमेरिकेंतील उत्पादनाचें प्रमाण मोठें आहे, त्याचें कारण तेथील नैसर्गिक अनुकूल परिस्थिति हें आहे. उदाहरणार्थ, अमेरिकन कोळशाच्या खाणींतून कोळसा काढणें अधिक सोपें आहे आणि अमेरिकन लोखंडाच्या खाणींतील दगडांत लोखंडाचें प्रमाण ज्यास्त आढळतें. सहाजिकच तेथील पिग आयर्नचें उत्पादन अधिक किफायतशीर होतें.

कारखान्यांत होणाऱ्या मालास केवढी मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे, ह्यावर उत्पादन कार्यक्षमतेनें व फायदेशीर होणें अवलंबून असतें. अमेरिकन मालाचा प्रत्यक्ष अमेरिकेंतच उठाव होण्यास केवढा तरी वाव आहे! हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या मोटारींच आपण घ्यावयाच्या ठरवल्या तरी ही बाजारपेठ अमेरिकन बाजारपेठेपेक्षां कितीतरी लहान आहे. लहान गिरण्या, मोठ्या गिरण्यांशीं स्पर्धा करूं शकत नाहींत.

गिरण्यांतील व कारखान्यांतील यंत्रसामुग्री किती सोयीस्कर व कार्यक्षम आहे, हेंहि पाहिलें पाहिजे. मोडक्या यंत्रावर कुशल कामगारहि चांगला व भरपूर माल काढूं शकणार नाहीं. दर माणसामागील योग्य यंत्राचा वापर जेवढा मोठा, तेवढें उत्पादन जास्त होतें. अहमदाबादमधील अद्ययावत् गिरणींत कामगार तुरळक तुरळक दिसतात. यांत्रिक सहाय्यच मोठें असतें. जुन्यापुराण्या, इतरत्र कशाबशा चाललेल्या गिरणींत कामगार स्त्री-पुरुषांची गर्दी आढळते. तेथें यंत्रें कमी व असलींच तींहि कांहीं बंद तर कांहीं फारच थोडें काम देणारीं! कोणत्या गिरणीस जास्त फायदा होईल व कोणत्या कामगारास जास्त वेतन मिळेल? अमेरिकन कारखान्यांत बसविलेली यंत्रसामुग्री ब्रिटिश कारखान्यांतील यंत्रसामुग्रीच्या मानानें अश्वशक्तीच्या हिशेबानें युद्धापूर्वी दुपटीइतकी होती.

ब्रिटिश कारखान्यांतील यंत्रसामुग्री वाढविणें व ती सुधारणें हा त्यांचे उत्पादन वाढविण्याचा व सुधारण्याचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. हिंदी औद्योगिक उत्पादनाच्या वाढीसाठी यंत्रसामुग्रीच्या आयातीवर ह्याचसाठी भर देण्यांत येत आहे. जुनीपुराणीं झिजलेलीं यंत्रें बदलून नवीं बसविणें, पूर्वी जेथें हातानें काम करण्यांत येत होतें तें यंत्रानें करणें, यंत्रें चालविण्यासाठी प्रेरकशक्ति स्वस्त किंमतीस उपलब्ध करणें, ह्यासाठीं लोकांना बचत करावयास लावून तिचा उपयोग भांडवली खर्चासाठी करणें, भांडवल गुंतवणुकीस प्रोत्साहन मिळेल असें धोरण आखणें, कामगारांना जास्त लक्षपूर्वक काम करण्यास प्रवृत्त करणें, इत्यादि बाबी निश्चयपूर्वक घडवून आणल्या पाहिजेत.

केवळ उत्कृष्ट यंत्रें बसवून भागणार नाहीं. त्यांचा उपयोग करून घेणारे हुशार यंत्रज्ञ व शास्त्रज्ञहि हवेत. नाहींतर यंत्रसामुग्रीवर केलेला खर्च वाया जावयाचा. ह्या दृष्टीनें विचार केला तर इंग्लंडच्या मानानें अमेरिकेंत कितीतरी पटीनें जास्त शास्त्रज्ञ व यंत्रज्ञ उद्योगधंद्यांत पडले आहेत. तज्ज्ञ लोकांच्या हातींच अमेरिकेंत उद्योगधंद्यांचें नेतृत्व आहे. इंग्लंडमध्यें तशी परिस्थिति नाहीं; तेथील उद्योगधंदे चालविणाऱ्या लोकांना, ते इतर बाबतींत वाकबगार असले तरी, उद्योगधंद्यांची यांत्रिक व तांत्रिक बाजू फारशी माहिती असूं शकत नाहीं. नव्या नव्या शोधांचा व कल्पनांचा उत्पादनांत उपयोग करून घेण्याचे कामीं इंग्रज कारखानदार अमेरिकन कारखानदारांचे कितीतरी मागें आहेत. कोळशापासून मौल्यवान पदार्थ बनविण्याचे कामीं जर्मनीनें पुढाकार घेतला होता; इंग्लंडनें नव्हे. शास्त्रज्ञ व यंत्रज्ञ ह्यांचा इंग्लंडमध्यें इतका अभाव, मग हिंदुस्थानाची गोष्ट कशाला!

अशा ह्या परिस्थितींत, अमेरिकेंत कोणता ब्रिटिश माल खपूं शकणार? आणि इंग्लंडला हव्या असलेल्या अन्नासाठी इंग्लंड कोणता माल जागतिक बाजारपेठेंत पाठवूं शकणार? इंग्लंडमधील उत्पादन अमेरिकन उत्पादनाच्या मानानें फार महाग पडतें. त्याचा दर्जाहि उच्च राहूं शकत नाहीं. त्यामुळें साहाजिकच परदेशी माल इंग्लंडमध्यें आणला तर त्याची किंमत देतां येत नाहीं. ब्रिटिश साम्राज्यांत पेरलेलें भांडवल युद्धकाळांत मोडून जीव बचावण्याकडे त्याचा उपयोग केला. परंतु त्यामुळें सुखानें रहाण्याचा एक मोठा आधार नष्ट झाला. इंग्लंडनें आपलें रहाणीचें मान उतरविलें, अधिक काटकसरीनें उत्पादन केलें आणि सामाजिक उद्धाराप्रीत्यर्थ होणारा सरकारी खर्च कमी केला, तर डॉलर तुटवड्याचा प्रश्न सोडविणें अवघड नाहीं. परंतु, अधिक काम न करतां, सध्याच्या सर्व सुखसोयी चालू ठेवण्याचा इंग्रजांनीं प्रयत्न चालविला तर तो यशस्वी होणें शक्य नाहीं.

इंग्लंडची अमेरिकेच्या संबंधांत जी परिस्थिति तीच हिंदुस्थानची इंग्लंड व तत्सम देशांचे संबंधांत आहे. म्हणजे, अमेरिकन कामगाराची इंग्रज कामगार बरोबरी करूं शकत नाहीं व त्याच्या इतकी संपत्ति निर्माण करूं शकत नाहीं, त्याच्या कितीतरी पटीनें हिंदी कामगाराचें उत्पादनसामर्थ्य कमी आहे. तेव्हां हिंदी पक्का माल बाहेर कसा खपणार? आणि मग आयात होणाऱ्या अन्नधान्याची किंमत कशी देणार? अमेरिका जास्त कार्यक्षम आहे, म्हणून तिला दोष देऊन भागणार नाहीं. जेथें इंग्लंडचाहि टिकाव लागत नाहीं, तेथें हिंदुस्थानचा कसा लागणार? अमेरिकन व ब्रिटिश कायद्यांचें व सवलतींचें अंधानुकरण न करतां, आज हिंदुस्थानानें जास्त नेकीनें व अधिक दीर्घकाळ काम करून आपण व आपले प्रतिस्पर्धी ह्यांचेमधील वाढतें अंतर तोडलें पाहिजे. हें घडवून आणणें अत्यंत अवघड आहे, परंतु अशक्य नाहीं.

("ज्ञानेश्वर," १६ ऑगस्ट, १९४९)

---

**काश्मीरमधील अन्नधान्याचा प्रश्न**—१९५१ साल अखेर काश्मीर अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण होईल, असें आश्वासन काश्मीरच्या सरकारनें हिंद सरकारला दिल्याचें समजतें. काश्मीर आणि जम्मू मधील १४ हजार एकर जमीन लवकरच यांत्रिक नांगरांच्या साह्यानें लागवडीस आणण्यांत येईल. ज्या ठिकाणीं हे नांगर उपयोगांत आणतां येण्यासारखे नाहींत त्या ठिकाणीं बैलांकडून मामुली नांगरट करण्यांत येईल. यांत्रिक नांगरांसाठी सरकारनें ४ लाख रुपये मंजूर केले आहेत.

**पूर्व बंगालमधील निराश्रित**—पूर्व बंगालमधून निघून आलेल्या ५,००० हिंदु निर्वासितांची सोय गंजम जिल्ह्यांत करण्याचें ओरिसा सरकारनें ठरविलें आहे. निर्वासितांसाठी पसंत करण्यांत आलेलें हें स्थान पूर्वी ओरिसाच्या राजधानीसाठी निवडण्यांत आलें होतें. ह्या ठिकाणीं फक्त नगरवासी निराश्रितांची सोय करण्यांत येणार आहे असें समजतें. ग्रामीण भागांतून आलेल्या निर्वासितांची स्वतंत्र सोय करण्यांत येणार आहे.

**संयुक्त प्रांताचा स्थानबद्धांवरील खर्च**—संयुक्त प्रांत सरकारच्या तुरुंगखात्याच्या अहवालांतील माहितीवरून असें दिसतें कीं, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि इतर राजकीय स्थानबद्धांच्या बंदोबस्तासाठी सरकारला १९४८ सालीं ७,३५,९९४ रुपये खर्च आला.

## आंतरराष्ट्रीय व्यापारांत समतोलपणा निर्माण होण्याची आवश्यकता

( भा. म. काळे. )

जागतिक व्यापारी परिस्थितीवर डॉलरच्या टंचाईमुळे ओढवलेल्या संकटाचा पूर्णपणें विचार केला असतां असें दिसून येतें कीं, निरनिराळया देशांतील असमाधानकारक कृषिविषयक व औद्योगिक उत्पादनामुळें आजची परिस्थिति निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार सुस्थिर्तींत राहावयाचा असल्यास ह्या व्यापारामध्यें समतोलपणा प्राप्त झाला पाहिजे व असा समतोलपणा व्यापार करणाऱ्या देशांच्या परिस्थितीला पोषक ठरला पाहिजे. १९४१ पासून अमेरिकेनें सुरू केलेली उधार–उसनवार योजना, युद्ध संपल्यानंतर इंग्लंडला अमेरिकेनें दिलेलें ३७५ कोटी डॉलर्सचें कर्ज, पश्चिम युरोपियन राष्ट्रांच्यासाठी मार्शल योजना, हिंद इ. देशांशीं गेलीं पांच वर्षें सतत वाढत चालणारा अमेरिकेचा व्यापार, इतर मागसलेल्या देशांना कर्जें देण्याची अमेरिकेची तत्परता, जगांतील जवळ जवळ ७० टक्के सुवर्णसाठ्याची मालकी, जपान व जर्मनी यांचें नष्ट झालेलें औद्योगिक जीवन व अमेरिकेची कृषिविषयक आणि औद्योगिक उत्पादनशक्ति या सर्वांचा समुच्चयानें जगावर झालेला परिणाम म्हणजेच सध्यांचें डॉलर्सचें प्रभुत्त्व व इतर अनेक युरोपियन व एशियाटिक राष्ट्रांचें परावलंबित्व. ह्याच परिस्थितीमुळें डॉलर–गट व स्टर्लिंग–गट हे दोन विभाग निर्माण झाले असून एकटा सोव्हिएट रशिया फक्त स्वतःच्या उत्पादनाच्या कार्यक्षमतेमुळें या कोणत्याहि विभागापासून अलिप्त राहिला असून, तो आपल्या जरूरी प्रमाणें इतर देशांशीं देवाण–घेवाण स्वरूपाचे व्यापारी करार करतो व हे करार परस्परांना पोषक होतात. अमेरिकेच्या नेतृत्त्वानें स्थापन करण्यांत आलेल्या जागतिक व्यापारी संघटनेकडून जिनेव्हा, लंडन, हॅव्हाना इ. ठिकाणीं पुष्कळ विचारमंथन झालें तरी जागतिक व्यापारांत समतोलपणा निर्माण होऊं शकला नाहीं, व त्यामुळें गेल्या महिन्यांत ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतील देशांच्या अर्थमंत्र्यांना परिस्थितीला तोंड देण्यासाठी एके ठिकाणीं येऊन विचार करावा लागला. अर्थमंत्र्यांच्या ह्या परिषदेंत एक गोष्ट निश्चित झाली ती ही कीं, डॉलर मालाच्या आयातींत शक्य तितकी काटकसर करणें व पौंडाची किंमत न उतरविणें. पौंडाची किंमत उतरविली नाहीं म्हणजे आपोआपच रुपयाची किंमतहि उतरवावी लागणार नाहीं. स्वतःचें उत्पादन वाढविणें व उत्पादनाच्या खर्चांत शक्य तितकी काटकसर करणें ह्याहि गोष्टी परिषदेंत सुचविण्यांत आल्या. आपल्या निर्गत मालाचें क्षेत्र व आकार वाढविण्याचे प्रयत्न याच वेळीं झाले पाहिजेत. अमेरिकेनेंहि जगांतील इतर देशांपासून माल खरेदी करण्यांत दिलदारपणा दाखविला पाहिजे. असें झालें तरच आजची परिस्थिति हळू हळू सुधारूं शकेल. याच वेळीं जगांतील मागासलेल्या राष्ट्रांचें राहाणीचें मान वाढविण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. या बाबतींत आशिया खंडांत किती कार्यक्षेत्र खुलें आहे याचें दिग्दर्शन नुकतेंच यूनोनें एशियाटिक राष्ट्रांच्या आर्थिक परिस्थितीबद्दल नेमलेल्या कमिटीच्या अहवालांत करण्यांत आलें आहे. सर्व परिस्थितीचा आढावा घेतल्यावर असें दिसून येतें कीं, प्रत्येक राष्ट्राच्या वाढत्या उत्पादनशक्तीवर व मागासलेल्या देशांतील राहाणीचें मान वाढण्यावर पुष्कळसे प्रश्न अवलंबून आहेत. उत्पादनशक्ति वाढली म्हणजे त्या त्या देशाच्या चलनाला आंतरराष्ट्रीय व्यापारांत महत्त्व प्राप्त होऊन परिस्थिति सुधारतें जाईल.

---


**धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.**

कोपरगांव, जि. अहमदनगर.

( उद्घाटन समारंभ : ता. १७-१-१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी

**स्थानिक सहकारी बँक**

सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.

**विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.**

जी. पी. ठाणेकर बी. ए. मॅनेजर. | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन.



**बांठिया बँक लिमिटेड**

हेड ऑफिस—पनवेल जि. कुलाबा.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु | ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ४२,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ५०,००,००० |

शाखा

मुंबईः–६५।६७ झव्हेरी बझार. | पुणेंः–१२६८ भवानी पेठ.
अहमदनगरः–बझार पेठ. | बेलापूररोडः–पोस्टासमोर,
कल्याणः–शिवाजी चौक. | भिवंडीः–बझार पेठ.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्रीमंत शेट रतनचंद भिकमदास बांठिया-अध्यक्ष.
" " केशरचंद आनंदराम बांठिया.
" " खिवराज आनंदराम बांठिया.
" " बिरदीचंद भूरचंद बांठिया-मॅ.डायरेक्टर.
" " चुनिलाल जसरूप मुनोथ.
" " रवजी भिमजी रंगपरिया.(ऑ.मॅजिस्ट्रेट.)

*श्रीमंत गंगाधर विष्णू ऊर्फ नानासाहेब पुराणिक.
श्री.रा. केशव गोविंद लिमये बी. ए. एलएल., बी. वकील पनवेल.
" जे. एस. कासट बी. कॉम.
" एस. आर. घासवाला (सेंट्रल ऑटो सर्व्हिस)
" ताराचंद दगडूराम भंडारी कापडाचे व्यापारी अहमदनगर.

श्री. रा. गणेश भैरव साठे, जनरल मॅनेजर.

★ *बँकिंगचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात.* ★

*विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.*

श्री. वालचंद सी. श्रीमाळ, बी. कॉम.
मॅनेजर, पुना ब्रँच.



खून साफ करनेमें मशहूर
डॉ. वामन गोपाल का सार्सापरिला

## कम्युनिस्टांची सरशी आणि चीनमधील बँका

चीनमध्यें कम्युनिस्ट लष्कराचा विजय होत चालला आहे. तेव्हां त्यांनीं जिंकलेल्या प्रदेशांतील बँकांचें काय होतें असा प्रश्न साहाजिकच उत्पन्न होतो. शांघायचा पाडाव झाल्यावर चिनी सरकारच्या बँकेच्या इमारती कम्युनिस्टांनीं आपल्या ताब्यांत घेतल्या. त्यानंतर चिनी राष्ट्रीय सरकारच्या ताब्यांतील प्रदेशांत असणाऱ्या शाखांनीं आपले व्यवहार कसे चालवावे ह्यासंबंधीं त्यांना हुकूम देण्यास सुरवात झाली. बँक ऑफ चायनाच्या ह्या मुख्य कचेरींकडून, त्या बँकेच्या परदेशी व इतर शाखांना अशी सूचना देण्यांत आली कीं, त्यांनीं राष्ट्रीय सरकारशीं असलेले आपले सर्व संबंध तोडून टाकावे. परंतु ह्या बँकेनें शांघाय लवकरच पडणार हें गृहित धरून, आपल्या कचेरींतील नोकर-वर्ग, सुवर्णनिधी, परकीय हुंडणावळ, इत्यादी सर्व कँटनला पाठवून तेथेंच आपली मुख्य कचेरी उघडली! ही घटना एप्रिलमध्येंच घडून आली. ज्या बँकांमध्यें सरकारचे बहुसंख्य भाग आहेत अशा आणखीही कांहीं बँका चीनमध्यें आहेत. त्या अशा:- सेंट्रल बँक ऑफ चायना, फार्मर्स बँक व बँक ऑफ कम्युनिकेशन्स. बँक ऑफ चायनाची कँटनला जी मुख्य कचेरी उघडण्यांत आली आहे, तिच्याच नियंत्रणाखाली सर्व शाखा आहेत. तथापि, प्रत्यक्ष व्यवहाराच्या दृष्टीनें ज्या भागांत कम्युनिस्टांचा अंमल नाहीं, त्याच भागांतील शाखांवर मुख्य कचेरीचें नियंत्रण चालतें. बँक ऑफ चायना ह्याच बँकेला परदेशी व्यवहार करण्याचा अधिकार आहे. तिच्या परदेशी शाखा १९ आहेत. शांघायच्या कचेरीकडून आलेल्या सूचना कम्युनिस्टांच्या ताब्यांत नसलेल्या प्रांतांतील शाखा मानीत नाहींत; कँटन येथील मुख्य कचेरीलाच त्या कायदेशीर मानतात. परदेशांतील शाखांचा प्रश्न मात्र वेगळा आहे. कम्युनिस्टांनीं जिंकलेल्या शांघाय, टिन्ट्सिन सारख्या मोठ्या शहरांचें परदेशांशीं दळणवळण सुरू झालें म्हणजे ह्या शाखांची परिस्थिति चमत्कारिक होण्याचा संभव आहे.

## पोस्टाचीं नवीं तिकिटें

सोमवार, ता. १५ रोजीं, स्वातंत्र्य दिनाचे सुमुहूर्तावर, नवीं पोस्टाचीं तिकिटें विक्रीस काढण्यांत आलीं आहेत:—

| किंमत | तिकिटावरील चित्र |
|---|---|
| ३ पै | अजंटा लेण्यांतील खांबावरील नक्षीकाम |
| ६ पै | जगन्नाथ पुरीजवळील कोनारक घोडा |
| ९ पै | घारापुरी येथील त्रिमूर्ति |
| १ आ. | बोधिसत्व |
| २ आ. | नटराज, तिरुवलंगडु येथील शिवाची मूर्ति |
| ३ आ. | सांची स्तूप |
| ३½ आ. | बुद्ध गया मंदिर |
| ४ आ. | भुवनेश्वर मंदिर |
| ६ आ. | गोलघुमट, विजापूर |
| ८ आ. | बुंदेलखंडांतील कांदार्य महादेव मंदिर |
| १२ आ. | अमृतसरचें सुवर्ण मंदिर |
| १ रु. | विजय स्तंभ, चितोडगड |
| २ रु. | लाल किल्ला, दिल्ली |
| ५ रु. | ताजमहाल आग्रा |
| १० रु. | कुतुब मिनार, दिल्ली |
| १५ रु. | शत्रुंजय मंदिर, पलिठाणा |

बेडेकर लोणचीं वापरा.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिस:—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B. }
श्री. नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर.




माणिक नं. 20 कपड्याकरितां उत्तम साबण

माणिक सोप वर्क्स ...कराड, (सातारा)...

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.